एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्यासाठी कृतीगट स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. मजनिप्रा- २०१७/२०३/(प्र.क्र.४१-भाग-१/२०१७/जसं(आस्था)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ डिसेंबर, २०१७

प्रस्तावना :-

राज्यात गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व पश्चिम वाहिनी खोरे अशी एकुण ५ खोरे आहेत. एकात्मिक राज्य जल आराखडा-गोदावरी खोरे तयार करण्यात आले असून त्यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ अन्वये राज्य जल परिषदेने दि.३०.११.२०१७ रोजीच्या चवथ्या बैठकीत मान्यता दिली आहे. उर्वरित कृष्णा खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे व पश्चिम वाहिनी नदी खोऱ्याचे एकात्मिक जल आराखडे हे एकात्मिक राज्य जल आराखडा - गोदावरी खोरे च्या धर्तीवर तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

राज्य जल परिषदेच्या दि.३०.११.२०१७ च्या चवथ्या बैठकीत “कृष्णा व तापी खोऱ्याचे एकात्मिक राज्य जल आराखडे जानेवारी, २०१८ अखेरीस तसेच नर्मदा व पश्चिम वाहिनी नदी खोऱ्याचे एकात्मिक राज्य जल आराखडे फेब्रुवारी, २०१८ मध्ये पूर्ण करुन राज्य जलमंडळ व राज्य जल परिषद यांच्या मान्यतेसह सर्व खोऱ्यांचा एकात्मिक राज्य जल आराखडा ३१ मार्च, २०१८ पर्यन्त अंतिम करावे" असे निदेश आहेत.

मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १७३/२०१३ बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२३/०९/२०१६ रोजी दिलेल्या एका महत्वपूर्ण निर्णयाद्वारे एकात्मिक राज्य जल आराखडा दिलेल्या विहित मुदतीत करणे बाबत आदेश आहेत.

मा. उच्च न्यायालय व राज्य जलपरिषदेच्या सुचनेनुसार कृष्णा, तापी, नर्मदा व पश्चिम वाहिनी नदी खोऱ्याचे एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्याचे काम संबंधित नदी खोरे अभिकरणाद्वारे प्रगतीत आहे. पूर्ण राज्याच्या सर्व नदी खोऱ्याचा एकात्मिक जल आराखडा विहित मुदतीत पूर्ण होण्यासाठी समांतररित्या ही कार्यवाही होणे आवश्यक आहे. या कामासाठी प्रत्येक नदीखोरे अभिकरणातून प्रत्येकी एक तज्ञ मुख्य अभियंता घेऊन कृतिगट गठित करणे बाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.-

शासन निर्णय :-

राज्यातील सर्व खोऱ्याचा एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्यासाठी पुढील प्रमाणे कृतिगट गठीत करण्यात येत आहे.

(अ) कृतिगटाची रचना :-

अ.क्र.	नाव	पदनाम
१.	महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक	अध्यक्ष
२.	मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक	सदस्य
३.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	सदस्य
४.	मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई	सदस्य
५.	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद	सदस्य
६.	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर	सदस्य
७.	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे	सदस्य सचिव

(ब) समितीची कार्यकक्षा :-

१) राज्य जल परिषदेकडून मान्यता प्राप्त एकात्मिक राज्य जल आराखडा-गोदावरी खोरे व प्रगतीत असलेल्या इतर खोऱ्याचे एकात्मिक राज्य जल आराखड्याचे समांतररित्या एकत्रीकरण करुन सर्व खोऱ्याचा "एकात्मिक राज्य जल आराखडा" मसुदा तयार करणे.

२) उपरोक्त तयार करण्यात आलेला "एकात्मिक राज्य जल आराखडा" मसुदा सर्व नदी खोरे अभिकरणां अंतर्गत कार्यकारी संचालकांची कार्यशाळा आयोजित करुन सदर कार्यशाळेत संमत करुन घेणे व त्यानुसार अंतिम मसुदा सर्व कार्यकारी संचालकांकडून प्रमाणित करुन घेणे.

३) प्रमाणित एकात्मिक राज्य जल आराखडा, राज्य जल मंडळास व तदनंतर राज्य जल परिषदेस सादर करण्यासाठी आवश्यक प्रतीत व मराठी व इंग्रजी सादरीकरणाच्या प्रतीसह शासनास **२८/०२/२०१८** पूर्वी सादर करणे.

(क) कृतिगटाचा कालावधी :-

सदर कृतिगटाचा कार्यकाळ **१५ मार्च २०१८** पर्यन्त असेल.

(ड) सदर कामासाठी येणारा खर्च प्रकल्पांवर होणारा खर्च - "४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, ८० सर्वसाधारण, १९० सार्वजनिक व इतर क्षेत्रातील गुंतवणुका (०४) योजनेत्तर, (०४) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान ४७०१ आय-१६२, ३२, अंशदान" या लेखाशीर्षाकडे भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७१२२७१४४२३४८८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, serialNumber=293016b5f13cd03f75c9f34c66d956309c8b3cd5faf07931d817577e6116e436, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2017.12.27 14:47:37 +05'30'

(र. रा. शुक्ला)

अधिक्षक अभियंता व उपसचिव (जसं) महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेते, विधान सभा व विधान परिषद,
७. मा.प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, विधान सभा व विधान परिषद
८. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
१२.सचिव, (प्रकल्प व समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.सचिव, जलसंधारण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४.सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई
१५. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, नाशिक
१६. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
१७. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
१८. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
१९. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२०. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
२१. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक
२२. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव
२३. मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई
२४. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद
२५. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
२६. मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग, पुणे
२७.सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२८.सहसचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२९.सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३०.जसं (आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.